सहकारी गृहनिर्माण संस्थामधील मासिक
देखभाल आकार न देणा-या सभासदांच्या
तक्रारी हाताळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः- सगृयो २००२/प्र.क्र.३६५/१४-स,
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०० ०३२.
दिनांक २ नोव्हेंबर २००२.

## परिपत्रक

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील काही सभासद संस्थेचा मासिक देखभाल आकार देणे बंद करतात यासाठी त्यांच्याकडून अनेक प्रकारची कारणे देण्यात येतात. उदा. संस्थेकडून सभासदांचे काही पैसे येणे आहे, संस्था सदनिकेची दुरुस्ती करत नाही, मासिक आकार जास्त आकारण्यात येत आहे इत्यादी. यामुळे मासिक आकार देण्याचे बंद केल्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीस संस्थेचा दैनंदिन कारभार चालविणे कठीण होते.

२. संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीने महाराष्ट्रसहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार निबंधकांकडे दाद मागितली असतां सभासद आपली तक्रार शासनाकडे / निबंधकांकडे प्रलंबित असल्याने देखभाल आकार दिला नाही असे प्रतिपादन करतात.

३. मासिक देखभाल आकार न दिल्याने संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीची होणारी अडचण लक्षांत घेता, अशा प्रकारची प्रकरणे निबंधकांनी कशा प्रकारे हाताळावी याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

(१) गृहनिर्माण सहकारी संस्थेतील सभासदांनी कोणत्याही कारणाने संस्थेस मासिक देखभाल आकार देण्याचे थांबवू नये .

२) एखाद्या सभासदाचे संस्थेच्या मासिक देखभाल आकाराबाबत व्यवस्थापकीय समितीशी काही मतभेद असल्यास त्यांनी तेसक्षम प्राधिका-याकडे अर्ज करून सोडवावे.निबंधकांकडे मासिक देखभाल आकाराबाबत सहकारी गृहनिर्माण संस्थेतील कोणत्याही सभासदाची तक्रार प्राप्त झाल्यास त्यांनी ती एक महिन्याच्या आंत निकाली काढण्याबाबत दक्षता घ्यावी.

३) सक्षम प्राधिका-यांनी मासिक देखभाल आकार जास्त आहे असे प्रमाणित केल्यास जास्तीची रक्कम सक्षम प्राधिका-यांनी दिलेल्या आदेशानुसार सभासदास परत करण्याची / मासिक देखभाल आकारातून वळती करण्याची कार्यवाही संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीने करावी.

Scanned by CamScanner

४) मासिक देखभाल आकार देण्याचे बंद करणा-या सभासदांच्या तक्रारीची दखल घेताना निबंधकांनी अशा सभासदास प्रथम संस्थेचे देणे अदा करण्याच्या सूचना देण्यात याव्या.

५) या परिपत्रकाची प्रत निबंधकांच्या कार्यालयात ठळकपणे दिसेल अशा प्रकारे लावण्यात यावी.

६) सर्व जिल्हा उपनिबंधकांनी हे परिपत्रक आपल्या अधिनस्त उप निबंधक / सहाय्यक निबंधक यांच्या निदर्शनास आणावे. तसेच जिल्ह्यातील गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या फेडरेशनाच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही देखील जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रा.वि.कुलकर्णी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग.

प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

(१) मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
(२) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव,
(३) सहकारआयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
(४) सर्व विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था,
(५) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
(६) कार्यासन अधिकारी, १५-अ, सहकार व वस्त्रोद्योग विभाग.
(७) निवड नस्ती.

Scanned by CamScanner